Tisari Pariksha- Listening

# भेळ

एका शनिवारी मी आणि माझ्या मित्रांनी भेळ करायचे ठरवले. मग साकेतने कुरमुरे आणले, रविने शेव आणली. आशा म्हणाली," मी उकडलेले बटाटे आणते". विशाखाच्या आईने कांदा चिरून दिला, माझ्या आईने चिंचगुळाची चटणी करून दिली. हे साहित्य घेऊन आम्ही सर्वजण सनफिश पार्कमध्ये गेलो. बरोबर सायकली होत्या. थोडा वेळ सायकल चालवल्यावर मग बास्केट बॉल खेळलो. मग एका झाडाखाली बसून गाणी म्हटली. आता सर्वांना भूक लागली होती. पार्कमधल्या नळावर जाऊन सर्वांनी हातपाय धुतले.

पार्कमधल्या बाकावर सर्व साहित्य ठेवले होते. एका मोठ्या पातेल्यात विशाखाने भेळ कालवली, कागदाच्या प्लेटमध्ये भेळ दिली. आम्ही तयार केलेली भेळ खाताना खूपच मजा आली. भेळ खूपच चटपटीत झाली होती. भेळ खाल्ल्यावर कोणीतरी म्हणाले, “आता आईस्क्रीम मिळाले असते तर काय मजा आली असती". तेवढ्यात माझी आई समोरून येताना दिसली. आश्चर्य म्हणजे तिने सर्वांसाठी आईस्क्रीम कोन आणले होते. आईस्क्रीम खाऊन सगळेजण खूष झाले. मी आईला म्हटले, " तुला कसे कळले की आम्हाला आईस्क्रीम हवे होते " यावर आई नुसती हसली.

**<u>प्रश्न</u>**

१. भेळ बनवण्यासाठी सर्वांनी कोणते साहित्य आणले?
२. आईने कोणती चटणी करून दिली?
३. पार्कमध्ये मुलांनी काय केले?
४. विशाखाने भेळ कशात कालवली?
५. सर्वांना भेळ खाल्या नंतर काय हवे होते?

Tisari Pariksha- Listening

# चीनची भिंत

आधुनिक जगातील सात आश्चर्यांपैकी एक म्हणून चीनची प्रचंड भिंत प्रसिद्ध आहे. या भिंतीने सुमारे अडीच हजार वर्षांहूनही जास्त चीनचा इतिहास बघितला आहे. चीनचे रक्षण करण्यासाठी भिंत बांधण्याची सुरूवात झाली. चीनच्या राजांनी दगड आणि मातीच्या विटांनी ही भिंत बांधली.

त्यानंतर अशाच भिंती चीनच्या वेगवेगळया राज्यात बांधल्या गेल्या. या भिंतीना एकत्र करून ही प्रचंड भिंत तयार झाली आहे. चीनची खूप मोठी सीमा होती म्हणून राजांनी भिंतीला सर्व सीमांपर्यंत पसरवण्यास सुरुवात केली. ही भिंत पर्वत, दऱ्या, जंगलातून पसरली आहे. युनेस्कोने १९८७ सालापासून चीनच्या भिंतीला जागतिक वारसा म्हणून जाहीर केले आहे. भिंत बघायला चीनला जरूर जा.

प्रश्न

१. चीनची भिंत का प्रसिद्ध आहे?
२. चीनच्या भिंतीने किती वर्षांचा इतिहास बघितला?
३. चीनच्या राजांनी भिंत का बांधली?
४. भिंत बांधण्यासाठी काय वापरले?
५. युनेस्कोने चीनच्या भिंतीला काय म्हणून जाहीर केले आहे?

Tisari Pariksha- Reading

# सर्कस

सर्कशीचा खेळ सुरू होता. सर्कशीत शिकारखान्यांत वाघ, सिंह, चित्ते, माकडे, हत्ती, घोडे, उंट आणि सांबर असे प्राणी होते. तंबूच्या वरच्या भागात उंचावर झोपाळ्यावरचे खेळ झाले. एका मुलीने धावत्या घोड्यावर स्वार होऊन दाखवले. सायकलवर बसलेल्या मुलीच्या खांद्यावर अनेक मुलींनी कसरती केल्या. रंगीबेरंगी पोशाखातले विदूषक प्रेक्षकांना हसवत होते. पाळीव प्राण्यांचे खेळ मोकळ्या रिंगणात झाले. जंगली प्राण्यांचे खेळ रिंगणाभोवती पिंजऱ्यात झाले. एका पिंजऱ्यात वाघ होता. एक छोटी मुलगी वाघाच्या पिंजऱ्यात शिरली आणि तिने वाघाच्या तोंडात आपली मान दिली. आम्हाला वाटले आता तिला वाघ खाणार की काय! लहान मुले तर रडू लागली. काहीनी डोळे मिटले. तेवढ्यात त्या मुलीने आपली मान बाहेर काढली आणि गोड हसून नमस्कार केला. लोकांनी खूप टाळ्या वाजवल्या.

<u>प्रश्न</u>

१. सर्कशीत कोणते जंगली प्राणी होते?
२. तंबूच्या वरच्या भागात उंचावर कोणते खेळ झाले?
३. सर्कशीत विदूषक काय करत होते?
४. मोकळ्या रिंगणात कोणत्या प्राण्यांचे खेळ झाले?
५. लहान मुले का रडू लागली?

Tisari Pariksha- Reading

# मधमाशी

तुम्ही मधमाशांचे घर पाहिले आहे का? या घराला पोळे किंवा मोहोळ असे म्हणतात. मधमाशांनी बांधलेल्या या घराचा प्रत्येक कप्पा अष्ट्कोनी असतो. सगळे कप्पे एक सारखे असतात. त्यांची संख्या हजारात असते. ते पाहून आपल्याला मधमाशांचे कौतुक वाटते. मधमाशा दूरदूरच्या फुलातून मध आणून या पोळयात साठवतात. मध आणि त्यापासून बनवलेल्या पदार्थांची दिवसेंदिवस बाजारातील मागणी वाढत आहे. मध गोळा करण्यासाठी शेतकरी मधमाश्यांचे पेटीमध्ये पालन करतात. आदिवासी लोक जंगलातून मध गोळा करण्याचा व्यवसाय अनेक वर्षे करत आहेत. पण त्यामुळे मधमाश्यांच्या जंगलातील अनेक वसाहती नष्ट झाल्या. त्यामुळे मधमाश्यांचे पेट्यांमध्येच संगोपन करणे योग्य ठरते.

प्रश्न

१. मधमाश्यांच्या घराला काय म्हणतात?
२. या घरांचा प्रत्येक कप्पा कोणत्या आकाराचा असतो?
३. मधमाश्या पोळयात काय साठवतात?
४. शेतकरी मधमाश्यांचे पालन कशात करतो?
५. जंगलातून मध गोळा केल्यामुळे काय झाले?